Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

**ORIGINAL ARTICLE**

# *'' आधुनिक संसूचन माध्यमांचा (Elecronic Media) राजकारणावरील प्रभाव''*

***नाईकनिंबाळकर यु.डी.***

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर,

**सारांश :**

मतदार व राज्यकर्ते यांच्यातील संसुचन हा लोकशाही शासन व्यवस्थेचा प्राणभुत पायाच असतो. मतदारांना मतदानासाठी उपयुक्त करण्यापासुन ते एका विशिष्ट उमेदवारालाच मत देण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी हे संसुचन अत्यावश्यक असते. परस्पर संवादाच्या संसुचनतेच्या मार्गास संख्यात्मक मर्यादा येत असल्याने किमान आपले विचार आपला कार्यक्रम आपल्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी संसुचनाच्या अनेक मार्गाचा वापर केला जातो. वर्तमानपत्रे, रेडीओ, टिव्ही सारखे श्राव्यमाध्यमे, चित्रपट – नाटकासारखी एकाचवेळी करमणुक करणारी अन् राजकीय जाणीवा जाग्या करणारी इर्करावगुंठत साधने, आसनाची पकड असणारे म्हणुनच काहीसे अविश्वसनीय वाटणारे शासकीय प्रसिध्दी खाते, सभा आणि मेळावे इत्यादी आजवरची परंपरागत संसुचन माध्यमें होत आजही ही माध्यमें प्रचलित आहेत. वर्तमानपत्रासारखे माध्यम तर नव्या बदलत्या स्वरूपात जनसामान्यावर प्रभाव टाकुन आहेच तरीही या परंपरागत माध्यमांपेक्षा सरसे ठरताना दिसताहेत ती विज्ञानांची नवीन आपले दुरदर्शन भ्रमणध्वनी (Mobile Phone) या सारखी माध्यमे कानामागुन आली. अन् तिखट झाली. या म्हणीप्रमाणे एकुणच राजकीय समझदारीवर प्रभाव वाढवीत असल्याचे दिसत आहे.

प्रस्तावना :

परंपरागत माध्यमांच्या मर्यादा लक्षात घेता या नव्या माध्यमांच्या प्रभावाची कारणे लक्षात येतात वर्तमानपत्र हे एक सर्वाधिक प्रभावशाली माध्यम होय. आजही या माध्यमाचा प्रभाव पुर्णतः ओसरलेला नाही. छापील अक्षरांवर बहुसंख्याकांचा विश्वास हे या माध्यमाचे बळ ''वर्तमानपत्रात छापुन आले आहे म्हणजे ते खरेच असणार'' असे मानणार एक मोठा वर्ग सगळीकडेच आढळतो. त्यामुळेच या माध्यमाचा पगडा जनतेच्या राजकीय मतांचा दिर्घकाळचा शिल्पकार ठरला. भारतापुरते बोलायचे झाले तर स्वातंत्र चळवळीतले वर्तमानपत्र हे प्रमुख हत्यार, तत्कालीन नेत्यांनी अत्यंत प्रभावीपणे वापरले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तर या माध्यमाची ताकद राज्यकर्तांना नमविणारी ठरली. भुतकाळातील या माध्यमाचे सुवर्णयुग सरत आल्याचे आता जाणवत आहे. त्याच्या सामर्थ्यस्थळे आढळतात. वर्तमानपत्र हे साक्षरांवर अंमल गाजविणारे माध्यम आहे. एकुण जनतेतील साक्षरतेचे प्रमाण विचारात घेता या माध्यमाच्या मर्यादाही लक्षात येतात. साक्षरतेचे कमी असणारे प्रमाण अन् असंख्य भाशिक गटात विभागलेल्या जनसमुहात वर्तमानपत्राच्या मर्यादा कळु लागतात. भरीसभर म्हणुन भारतीय जनतेची ॠणशक्ती अन् मानसिक ता. वर्तमानपत्र विकत घेणे ही आजही सामान्य माणसांची विशेषतः ग्रामीण भारतीयाची प्राथमिक गरज नाही. वर्तमानपत्राच्या खपाचे आकडे याचे पुरावे आहेत. एका वर्तमानपत्राचे अपुरी दुर्गम भागात वर्तमानपत्रे पोहोचणे अवघड असतांना त्यांचा प्रभाव कसा तयार होणार?वर्तमानपत्रांच्या या सगळया मर्यादा लक्षात घेता व्यापक व्यापक म्हटल्या जाणा–या या माध्यमाची तथाकथित ताकद लक्षात येते. तुल्यबळ असे प्रतिस्पर्धी माध्यम नसल्याने आजवर या माध्यमाची मक्तेदारी होती. याशिवाय परंपरागत असणारी इतर संसुचन माध्यमे (नाटक, सिनेमा, सभा, मेळावे इत्यादीच्या मर्यादा) क्षीण आहेत. जनमनावर फार अल्पकाळ या माध्यमांचा प्रभाव राहतो. स्वातंत्रप्राप्तीच्या लक्षात एकेकाळी अत्यंत सामर्थ्यशाही ठरलेले. सभेसारखे माध्यम आजच्या काळात निस्तेज झाल्यासारखे दिसते. प्रभावी वक्तांचा अभाव, सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातील वाढते ताणतणाव, वेळेचा अभाव यासारखी कारणे या निस्तेजपणात आहेत तसेच प्रभावी पर्यायी माध्यमांची उपलब्धता हे देखील एक प्रमुख कारण आहेत. हा प्रभावशाली पर्यायी साधने कोणतही?तर दुरदर्शन, चित्रफिती (C D) भ्रमणध्वनी (Mobile) इत्यादी

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रकटलेल्या या माध्यमांनी आता मानवी व्यवहाराची सर्व अंगे व्यापण्यास सुरूवात केली आहे. मग राजकारण यापासुन कसे अलिप्त राहणार?संस्कृती परिचयाचा अन् प्रसाराचा बुरखा घेऊन पहाटेपासुन माणसाच्या दिवसात उतरणारे दुर–दर्शनसारखे माध्यम अखंड दिवसभर सामान्य माणसाच्या आयुष्यात काहीना काही भर घालतच असते. ही भर विधायक की विघातक हा प्रश्न वेगळा पण सामान्य माणसाचया मनावर पर्यायाने मतावर परिणाम मात्र हे माध्यम करीत असते हे वास्तव आहे. राजकारणी या बदलाची नोंद न घेतील तर नवल पण मतप्रवाह घडविणारी फक्त आणि फक्त व्यवसाय म्हणुन बातम्या पुरविणारी प्रसंगी व्यवसायाची मागणी म्हणुन अन् वाढत्या स्पर्धेत अग्रणी राहण्यासाठी म्हणुनही बातम्या अक्षरशः घडविणा–या खाजगी दुरदर्शन वाहिन्या या माध्यमाची ताकद ओळखुन वाढत्या संख्येने यात येत आहेत.

बातमी ऐकणे, वाचणे आणि पहाणे यात विलक्षण मोठा फरक आहे. ऐकलेल्या, वाचलेल्या बातमीचा मनावरील प्रभाव पाहिलेल्या बातमीच्या तुलनेत नक्कीच कमी असतो. विश्वासार्हतेचाच विचार केला तर, मते घडविण्याच्या संदर्भात ऐकणे, वाचणे अन् पहाणे असा चढता क्रम असतो. दुरदर्शनसारख्या दृकश्राव्य माध्यमात तर साक्षरतेचे अन् भाषिकतेच्या मर्यादाचेही अडथळे नसतात. म्हणुन तर इतर कोणत्याही माध्यमांपेक्षा वेगाने हे माध्यम प्रस्थापित झाले आहे. राजकारण अन् राजकारणी यांच्यावर या माध्यमाचा परिणाम होणे साहजिकच आहे. लोकभावनाशी निगडीत असणारे हे क्षेत्र दुरदर्शनसारख्या माध्यमांची दखल घेतल्याशिवाय कसे राहिल?

राजकारणावर थेटपणाने प्रभाव पाडणा–या या माध्यमाची ताकद भारतीय जनतेने नजिकच्याच काळात अनुभवली आहे. सत्तारूढ अन विरोधी पक्षात आरोपीची देवाणघेवाण सतत चालुच असते. एखाद्या गैरप्रकाराचा भ्रश्टाचाराचा सुगावा लागतो, गौप्यस्फोट केल्याप्रमाणे असे प्रकार जनतेपुढे आणले जातात, संबंधित नेता तेवढयाच उच्यारवात ते आरोप नाकारतो. मग आरोप कारणा–याकडुन प्रचंड गदारोळात परत परत त्या आरोपांचा संसदेपासुन जाहिर सभापर्यंत पुनरूच्चार केला जातो. कुठेतरी सुतभर पुराव्याचा धागा हाती असतो. त्याचेच भांडवल केले जाते. मग सत्ताधारी निस्पृहतेचा अन् न्यायबुध्दीन समतोल असल्याचा आव आणीत त्या आरोपांची चौकशी करण्याकरीता चौकशी समिती नेमतात. पुढचे रामायण सर्वज्ञात आहेच. वर्षानुवर्षाच्या दळणानंतरही या चौकशीतुन ठोस असे काही निष्पन्न होत नाही. अशा चौकशीच्या असंख्य थडग्यांनी भारतीय राजकारणाची भुमी व्यापलेली आहे.

या पार्श्वभुमिवर दृकश्राव्य माध्यमांनी पार पाडलेली ''ऑपरेशन दुर्योधन'' सारखी स्ट्रींग ऑपरेशन पाहिली तर त्यांचे यश उल्लेखनिय आहे. वर्शानुवर्श चालणारे चौकशीचे गु–हाळ नाही. साक्षी पुराव्याबाबत संदिग्धता नाही. अहवालांची न संपणारी प्रतिक्षा नाही. अन् सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वसामान्य जनतेचे ''हा सुर्य हा जयप्रथ'' न्याय झाल्याचे पाहिले असल्याने ख–या अपराध्यांना या सगळयाचा इन्कार करता आला नाही. संबंधित पक्षांना नेतृत्वाला याची दखल घ्यावीच लागली. व कृतीही करावी लागली–लगतेच इतपत झटपट न्यायाची हमी आजवर कोणत्या माध्यमाने दिली आहे?अगदी भा. ज. प. अध्यक्ष बंगारू लक्ष्मण यांच्यापासुन ते परवापरवांचे संसदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतलेल्या प्रकरणापर्यंत जनतेला अत्यंत वेगाने न्याय मिळाण्याची भावना तयार झालेली दिसते. एरव्ही अशा प्रकरणात चौकशी ची वेगवेगळया पातळयावरची आवर्तने झाली असती कमालीच्या कौशल्याने सलापासुन सार्वभौम जनतेला दुर ठेवले गेले असते. आरोप – प्रत्यारोपांचा, खुलाशांचा धुरळा उडाला असता. सर्वसामान्यांना संभ्रमांत पाडले गेले असते. पण वर उल्लेखित प्रकरणात राजकारण्यांची ही परंपरागत शस्मेच हिरावुन घेतली गेल्याने साफ साफ कबुली जबाब देण्याशिवाय अन् तत्काळ त्यावर निर्णय घेण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्यायच राहिला नाही. त्यामुळेच स्वतःची संशयास्पद प्रकरणे गाडण्यात यशस्वी झालेले अनेक नेते स्टींग ऑपरेशन सारख्या प्रकरणांतुन दोशी झाले त्यांना शिक्षा मिळणे योग्यच असल्याचे सांगताना दिसतात. हे यश इलेक्ट्रोनिय माध्यमांचे आहे. तहलका किंवा ऑपरेशन दुर्योधन सारख्या प्रकरणातील खासदारांना त्वरीत पक्षातुन व पडावरून जावे लागले. कोणीही त्यांचे संरक्षण वा समर्थन करू शकला नाही. हा दरारा इलेक्ट्रोनिक माध्यमांचा आहे.

भ्रष्ट्राचाराची अशी प्रकरणे जनतेपुढे मांडणे हा एकमेव मार्ग या माध्यमांनी स्विकारला तर हे माध्य (शस्त्र) फार काळ धारदार राहणार नाही. हे त्यांनाही माहित आहेच. त्यामुळे सरकारच्या मालकीच्या वाहिन्या सरकारच्या फक्त यशस्वी कार्यक्रमांनी दर्शन घडवित असतात. तर खाजगी वाहिन्या फसलेल्या बेफिकीरीच्या दुर्लक्षिलेल्या योजनाचे विकास कार्यक्रमांचे दईन घडवीत असतात. तत्काळ नाही पण उशीरा का होईना राज्यकर्त्या पक्षाला याची दखल घ्यावी लागते आहे असे दिसते विकास कार्यक्रमांचा हा पंचनामा प्रत्यक्ष दृश्यातुन येतो तसेच चर्चा, मुलाखती, आमने–सामने झडणारे सवाल जबाब यातुन ही जनतेपुढे वास्तव येवु लागले आहे. महाचर्चा सारख्या कार्यक्रमातुन निरूत्तर होणारे किंवा गोलमालपणे उत्तरे देणारे राजकारणी पाहुन जनतेची फक्त करमणुक होत नाही तर त्यातुन मतप्रवाह ही तयार होतात हे राजकिय धुरधरांच्या लक्षात आले आहे. परिणामी वागण्या बोलण्यात काहीशी सावधगिरी आल्याचे आढळते.

भारतीय राजकारणात शारिरीक व्यक्तिमत्वाचा विचार याआधी फारशा गांर्भीर्याने या आधी झाला नव्हता त्याची आवश्यकता ना जनतेला भासली ना नेत्यांना पण दुरदुर्शनसारखे सुक्ष्म दृकमाध्यम आल्यानंतर मात्र या क्षेत्रातही झालेला बदल जाणवण्याइतका ठळक आहे. निटनेटके कपड सौंदर्यप्रसाधनांचा वापर (कलप वगैरे) जावीणपुर्वक अवलंबिलेली देहबोली इत्यादी व्दारे व्यक्तिगंत प्रतिमा जपल्या जावु लागत आहेत. इलेक्ट्रॅानिक माध्यमांचा हा प्रभाव दुय्यम आहे. पण तो आहे हे तशीच सभा चालु असताना झोपी गेलेले पंतप्रधान या माध्यमामुळेच जनतेला पहायला मिळाले. अन् त्याचा परिणाम होतोच त्यामुळेच दिर्घकाळाच्या आजारानंतर किंवा शस्त्रक्रियेनंतर अनेक नेत्यांनी या प्रभावी माध्यमाना तोंड दाखविणे टाळते आहे.

संसदेतील कामकाजाचे थेट प्रक्षेपणही काही अशी का होईना नेत्यांची जनमानसातील प्रतिमा तयार करण्यास कारण होते आहे. कोटयावधी लोक एकाचवेळी आपल्या संसदिय कामगिरीची दखल घेत आहेत ही जाणीव जबाबदार नक्कीच बनविते क्वचित प्रसंगी मुळस्वभाव उफाळुन येतात व जबाबदारीचे भान हरपुन गदारोळही होतो.

स्टींग ऑपरेशन सारख्या प्रकरणातुन या माध्यमाची ताकद दिसली. न्यायालयाच्या ऐरणीवर ती टिकेल न टिकेल पण संबंधित नेत्यांची जनमानसातील प्रतिमा उध्वस्त झाली आहे ती परत कधीही प्रस्थापित होणार नाही. निदान राजकारणाचा वापर व्यक्तिगत स्वार्थासाठी करणा–या राजकारण्यांनी या गोष्टीचा धसका घेतला आहे. माहितीचा अधिकार अन् स्ट्रींग ऑपरेशनसारखी दोन प्रभावशाली साधने भारतीय जनतेच्या हाती आल्याचा दुर्मिळ योग लोकशाहीला बळ देणाराच आहे. अस्त्राचा वापर विधायक करणासाठी करावयाचा की विधायक करणासाठी हा प्रश्न तर सनातनकाळापासुनचा आहे. माध्यमांच्या विवेकबुध्दीवरच या प्रश्नाचे उत्तर अवलंबुन असेल हे तर उघडच आहे.

आज विकिलिक्स हे नाव जगभरातील सर्वच प्रगत देशांत विशेष करून अमेरिकेत प्रचंड प्रमागांत खळबळ उडवुन देत आहे. विकिलिक्सचा सुरूवात जरी 2006 साली झाली असली तरी त्याचा खरा फटका आताच बसतो आहे. अमेरिका हादरून गेली आहे. ज्युलिअन असोज सारख्या पत्रकाराने महासत्तेला आव्हान द्यावे अमेरिका हे आव्हान कसे पेटते याकडे जगाचे लक्ष लागले आहे. मात्र एक तितकेच खरे की ब्रेकींग न्युजच्या नावाखाली सत्य बाहेर आणण्याचा प्रयत्न करतात मात्र सरकार किंवा भांडवलदार वर्गाला जराही अडचणीत न आणण्याचा प्रयत्न करतात. कारण बहुतेक प्रसार माध्यमे भांडवलदारांच्या मालकीची आहेत.

### *संदर्भसुची*

1)भारतीय राजकारण दशा आणि दिशा पत्रकारिता कालची आजची, उद्याची ले मधुकर भावे.
2)किर्लोस्कर मार्च 2011
3)राजकिय समाजशास्त्र डॉ. इनामदार

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net